महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

४था मजला, एक्सप्रेस टॉवर्स, नरिमन पॉईंट, मुंबई ४०० ०२१
दूरध्वनी : ०२२-२२०२६५४९, २२८३५२४७,२२०२५३५४
ई-मेल : ms.mjp2022@gmail.com, mjpcao@gmail.com

जा.क्र.मजीप्रा-२०२६/प्र.क्र.११/विवक्षित/आ-१ (उविअ) दिनांक :- ३०/०६/२०२६

प्रति,

सहाय्यक संचालक (जाहिरात),
माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
मंत्रालय, मुंबई

विषय :- महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या सेवेतून सेवानिवृत्त अधिकाऱ्यांच्या सेवा करार पध्दतीने विवक्षित कामासाठी घेणेबाबत.
प्राधिकरणाच्या मध्यवर्ती कार्यालयाच्या स्तरावर नामिकासुची (Panel) तयार करणेबाबत.

प्राधिकरणाच्या मध्यवर्ती कार्यालय व प्राधिकरणाच्या क्षेत्रिय कार्यालयातील आवश्यकतेनुसार विवक्षित कामे करुन घेण्यासाठी, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या आस्थापनेवरुन सेवानिवृत्त झालेल्या उप अभियंता, कनिष्ठ/शाखा अभियंता, व सहाय्यक अभियंता श्रेणी-२ (स्थापत्य/यांत्रिकी) यांची सेवा, करार पध्दतीने घेण्याकरीता प्राधिकरणाच्या मध्यवर्ती कार्यालयाच्या स्तरावर नामिकासुची (Panel) तयार करावयाची आहे. करिता, जाहिरात सुचना क्र.१ सन २०२६-२७ सोबत पाठविण्यात येत आहे. सदरची जाहिरात सर्वात जास्त खपाच्या राज्यस्तरीय प्रसिध्द होणाऱ्या एका दैनंदिन मराठी वर्तमानपत्र व एका इंग्रजी वर्तमानपत्रात ९.५ x ६.०० चौ.से.मी. आकारातच एकदाच प्रसिध्दी देणेविषयी विनंती आहे.

१)	कार्यालयाचे नांव	:	मुख्य प्रशासकीय अधिकारी, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, सिडको भवन, २ रा मजला, दक्षिण कक्ष, नवी मुंबई
२)	वृत्तपत्रात सविस्तर सूचना प्रसिध्द होण्याचा दिनांक	:	०७.०७.२०२६
३)	प्रसिध्दी कोणत्या स्तरावर आवश्यक आहे	:	राज्यस्तरीय
४)	जाहिरातीचे देयक कोणाकडे पाठवावयाचे आहे	:	मुख्य प्रशासकीय अधिकारी, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, सिडको भवन, २ रा मजला, दक्षिण कक्ष, बेलापूर नवी मुंबई

जाहिरातीचे देयक (जाहिरातीसह) जाहिरात प्रसिध्द झाल्यानंतर आठ दिवसांत वर नमुद केलेल्या कार्यालयात पोहोचेल अशा प्रकारे आपल्या स्तरावरुन कळवावे.

सोबत :- जाहिरात सुचना

(गजानन गुरव)
मुख्य प्रशासकीय अधिकारी

प्रत :- उप अभियंता (आयटी सेल), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, सिडको भवन बेलापूर, नवी मुंबई यांना माहिती व कार्यवाहीसाठी.

सोबत जोडलेली जाहिरात सूचना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करुन या कार्यालयास उलट टपाली अवगत करावे.

सोबत :- जाहिरात सूचना व अर्जाचा विहीत नमुना

प्रत :- कक्ष अधिकारी (आ-६), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, सिडको भवन बेलापूर, नवी मुंबई यांना माहिती व कार्यवाहीसाठी.

प्रत :- कार्यालयीन सूचना फलक.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

संक्षिप्त जाहिरात सुचना क्र. १ सन २०२६-२७

प्राधिकरणाच्या मध्यवर्ती कार्यालय व प्राधिकरणाच्या क्षेत्रिय कार्यालयातील आवश्यकतेनुसार विवक्षित कामे करुन घेण्यासाठी, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या आस्थापनेवरुन सेवानिवृत्त झालेल्या उप अभियंता, कनिष्ठ/शाखा अभियंता, व सहाय्यक अभियंता श्रेणी-२ (स्थापत्य/यांत्रिकी) यांची सेवा, करार पध्दतीने घेण्याकरीता प्राधिकरणाच्या मध्यवर्ती कार्यालयाच्या स्तरावर नामिकासुची (Panel) तयार करावयाची आहे. याबाबतचा सविस्तर तपशिल https://mjp.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

सही/-

मुख्य प्रशासकीय अधिकारी

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

४था मजला, एक्सप्रेस टॉवर्स, नरिमन पॉईट, मुंबई ४०० ०२१
दूरध्वनी : ०२२-२२०२६५४९, २२८३५२४७,२२०२५३५४
ई-मेल : ms.mjp2022@gmail.com, mjpcao@gmail.com

सविस्तर सूचना क्र.१, सन २०२६-२७

जल जीवन मिशन व इतर योजनांचा कार्यभार तसेच अभियंत्यांची कमतरता इत्यादी कार्यालयीन कामाची निकड लक्षात घेता, सामान्य प्रशासन विभागाच्या दि.१०.६.२०२५ रोजीच्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार, प्राधिकरणाच्या मध्यवर्ती कार्याल व क्षेत्रिय कार्यालयातील आवश्यकेनुसार विवक्षित कामे करुन घेण्यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या सेवेतून सेवानिवृत्त झालेल्या खालील संवर्गातील अधिकाऱ्यांची नामिकासुची (empanelment) मध्यवर्ती कार्यालयाच्या स्तरावरुन करण्याचे प्रस्तावित आहे.

१. उप अभियंता (स्थापत्य)
२. कनिष्ठ/शाखा अभियंता, सहाय्यक अभियंता श्रेणी-२ (स्थापत्य)
३. उप अभियंता (यांत्रिकी)
४. कनिष्ठ/शाखा अभियंता, सहाय्यक अभियंता श्रेणी-२ (यांत्रिकी)

२. सामान्य प्रशासन विभागाच्या दि.१० जून, २०२५ रोजीच्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार नियुक्ती करावयाची असून सदर शासन निर्णयातील तरतुदीनुसार, नियुक्त करावयाच्या सेवानिवृत्त उप अभियंता, कनिष्ठ/शाखा अभियंत व सहाय्यक अभियंता श्रेणी-२ (स्थापत्य/यांत्रिकी) यांना मासिक पारिश्रमिक व भत्ते देय राहतील. याकरिता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या आस्थापनेवरुन सेवानिवृत्त झालेल्या व कामाचा अनुभव असलेल्या इच्छूक उप अभियंता, कनिष्ठ/शाखा अभियंत व सहाय्यक अभियंता श्रेणी-२ (स्थापत्य/यांत्रिकी) यांचेकडून विहित नमुन्यात विवक्षित कामाकरीता करार पध्दतीने नियुक्ती करण्याकरिता अर्ज मागविण्यात येत आहे.

३. सदर अर्ज 29 जुलै, २०२६ पर्यत सायंकाळी ५.०० वाजेपर्यत मुख्य प्रशासकीय अधिकारी, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, सिडको भवन, २ रा मजला, दक्षिण कक्ष, बेलापूर नवी मुंबई -४००६१४ या पत्त्यावर/estt1mjp@gmail.com वर पाठवावेत. यानंतर आलेले अर्ज स्विकारले जाणार नाहीत.

४. जाहिरातीनुसार महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या आस्थापनेवरुन पात्र सेवानिवृत्त अधिकाऱ्यांकडून अर्ज मागविण्यात येतील. तसेच सदर जाहिरातीमध्ये, "विवक्षित कामासाठी" कोणत्या प्रादेशिक विभागात नियुक्तीस इच्छुक असल्याबाबतची इच्छुकता देण्यात यावी.

५. जाहिरातीनुसार पात्र झालेल्या अर्जांची गुणवत्तेनुसार छाननी मुख्य प्रशासकीय अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली गठीत केलेल्या समितीकडून करण्यात येईल. व पात्र अर्जदारांची प्रादेशिक विभाग निहाय तयार केलेली नामिकासुची (panel) सक्षम प्राधिकारी मा.सदस्य सचिव, म.जी.प्रा. यांचे मान्यतेने प्राधिकरणाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

६. सदर नामिकासुची मध्यवर्ती कार्यालयाच्या स्तरावर ठेवण्यात येईल. कामाच्या आवश्यकतेनुसार मुख्य अभियंता यांचे मागणीनुसार उपरोक्त नामिकासुची (panel) मधील उप अभियंता, कनिष्ठ/शाखा अभियंता,

सहाय्यक अभियंता श्रेणी-२ (स्थापत्य/यांत्रिकी) या संवर्गातील मंजूर आकृतीबंधानुसार मंजूर पदांच्या १०% च्या मर्यादेत प्रादेशिक विभागनिहाय विवक्षित कामासाठी नियुक्ती देण्यात येईल.

७. उपरोक्त संवर्गातील अभियंता म.जी.प्रा.च्या ज्या विभागीय कार्यालयातून (Division office) नियत वयोमानाने सेवानिवृत्त झाला असल्यास, त्या विभागीय कार्यालयात त्यांना नियुक्ती देता येणार नाही. तसेच ज्या अधिकाऱ्यांवर तक्रारी आहेत, त्यांना विवक्षित कामाकरीता नियुक्ती देण्यात येणार नाही.

८. अटी व शर्ती :-

१. सदर नियुक्ती ही सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक १० जून, २०२५ रोजीच्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार करण्यात येईल.

२. अर्जदार सेवानिवृत्त उप अभियंता, कनिष्ठ/शाखा अभियंत व सहाय्यक अभियंता श्रेणी-२ (स्थापत्य/यांत्रिकी) या संवर्गातील असावेत.

३. जल जीवन मिशन व इतर योजनांच्या अंमलबजावणीच्या कामाचा किमान ५ वर्षाचा अनुभव असावा.

४. उमेदवारास मराठी व इंग्रजी भाषेचे चांगले ज्ञान असावे.

५. उमेदवाराचे वय ६५ वर्षापेक्षा अधिक नसावे.

६. आवश्यक असलेली अर्हता धारण करणाऱ्या इच्छूक सेवानिवृत्त उप अभियंता, कनिष्ठ/शाखा अभियंता व सहाय्यक अभियंता श्रेणी-२ (स्थापत्य/यांत्रिकी) यांनी सदर पदाकरिता विहित नमुन्यात अर्ज सादर करावा.

७. इच्छूक उमेदवारांनी अर्ज वर नमुद केलेल्या कालावधीमध्ये सादर करावेत.

८. उमेदवारांनी अर्जामध्ये, विवक्षित काम करण्यास कोणकोणत्या प्रादेशिक विभागात काम करण्यास इच्छूक आहात, अशा प्रादेशिक विभागांची नांवे नमुद करावीत.

९. प्राधिकरणास आवश्यक असलेली अर्हता व अनुभव नसलेल्या सेवानिवृत्त उप अभियंता, कनिष्ठ/शाखा अभियंता व सहाय्यक अभियंता श्रेणी-२ (स्थापत्य/यांत्रिकी) यांनी अर्ज सादर केल्यास, अशा अर्जांचा विचार करता येणार नाही. तसेच अशा अर्जासंदर्भात केलेल्या पत्रव्यवहाराची दखल घेण्यात येणार नाही अथवा त्या अर्जांना उत्तर देण्यात येणार नाही.

१०. पात्र उमेदवारांची छाननीअंती व सक्षम प्राधिकाऱ्यांच्या मान्यतेने नामिकासुची तयार करण्यात येईल. नामिकासुचीतील समाविष्ट अधिकाऱ्यांची नांवे कमी करण्याचा संपुर्ण अधिकार प्राधिकरणाच्या मध्यवर्ती कार्यालयास राहिल.

११. करार पध्दतीने नियुक्त केलेल्या सेवानिवृत्त उप अभियंता, कनिष्ठ/शाखा अभियंत व सहाय्यक अभियंता श्रेणी-२ (स्थापत्य/यांत्रिकी) यांना अधीक्षक अभियंता (मुख्यालय), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, एक्सप्रेस टॉवर्स, मुंबई व मुख्य प्रशासकीय अधिकारी, म.जी.प्रा., बेलापूर नवी मुंबई व संबंधित प्रादेशिक विभागाचे मुख्य अभियंता यांचे नियंत्रणाखाली काम करावे लागेल. व त्यांचेकडे कामकाजाचा अहवाल दरमहा सादर करावा लागेल.

१२. इतर अटी व शर्ती हया सामान्य प्रशासन विभागाच्या दि.१० जून, २०२५ रोजीच्या शासन निर्णयात नमुद केल्याप्रमाणे लागू राहतील.

(गजानन गुरव)
मुख्य प्रशासकीय अधिकारी

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

अर्जाचा नमुना

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या आस्थापनेवरुन सेवानिवृत्त उप अभियंता, कनिष्ठ/शाखा अभियंता व सहाय्यक अभियंता श्रेणी-२ (स्थापत्य/यांत्रिकी) यांना विवक्षित कामाकरीता करार पध्दतीने नियुक्ती करण्यासंदर्भाने नामिकासुची (Panel) मध्ये नांवाचा समावेश करणेकरीता अर्ज

अर्जदाराचा अलिकडील काळाचे छायाचित्र

१. अर्जदाराचे संपुर्ण नांव :-

२. अर्जदाराचा पत्ता :-

३. काम करण्यास इच्छूक असलेला प्रादेशिक विभाग

४. भ्रमणध्वनी क्रमांक व ईमेल आयडी :-

५. जन्मदिनांक व वय :-

६. सेवानिवृत्त झाल्याचा दिनांक व कार्यालय (सोबत आदेशाची प्रत जोडावी.) :-

७. सेवानिवृत्तीच्या वेळेचे पदनाम व कार्यालयाचे नांव :-

८. प्राधिकरणास आवश्यक असलेली अर्हता आहे किंवा कसे :-

९. मुळ निवृत्ती वेतन (निवृत्तीवेतन मिळत असलेल्या आदेशाची प्रत जोडावी.) :-

१०. शैक्षणिक अर्हता :-

११. अनुभव :-

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने सविस्तर जाहिरातीमध्ये नमुद केलेली कामे व संबंधित नियंत्रण अधिकारी यांची सुचविलेली कामे इत्यादी विवक्षित कामे करण्याकरीता तसेच सदरील कामे करण्याकरीता कमीत कमी ५ वर्षाचा अनुभव असलेल्या सेवानिवृत्त उप अभियंता, कनिष्ठ/शाखा अभियंता व सहाय्यक अभियंता श्रेणी-२ (स्थापत्य/यांत्रिकी) यांची सेवा करार पध्दतीने घेण्यासंदर्भाने नामिकासुची (Panel) तयार करणेसाठीची जाहिरात/सुचना मी काळजीपुर्वक वाचली असून सदर जाहिरातीतील/सुचनेतील सर्व अटी व शर्ती मला मान्य आहेत.

ठिकाण :-

दिनांक :- (अर्जदाराची स्वाक्षरी व नांव)